ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SJIF 2013 = 4.194
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# पुणे जिल्हयातील आदिवासी विभागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या (शैक्षणिक/व्यवसायिक) क्षेत्राचा अभ्यास

**प्रा. शरद हरी विश्वासराव, Ph. D.**

*आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय पुणे*

**प्रस्तावना**

भारत देशात अनेक धर्म, संस्कृती व भाषा असलेला समाज एकत्र नांदत असला तरी त्याच्या सामाजिक आर्थिक व शैक्षणिक विकासात खूप विविधता आढळते. भारत देशात एका बाजूला शहरी संस्कृतितील समाज खूप पुढारलेला आढळतो तर दुसऱ्या बाजूला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक समाज सामाजिक आर्थिक व दृष्ट्या मागासलेला आढळतो. ही सामाजिक दरी नाहीशी करण्याची जबाबदारी शिक्षणाची आहे.

देशाच्या शहरी, ग्रामीण अथवा आदिवासी विभागाच्या विकासात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. मनुष्यबळ विकासासाठी शिक्षण ही महत्त्वाची गुंतवणूक आहे हे विकसित व विकसनशील देशांनी मान्य केले आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या विकासात शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणाद्वारे समाजाच्या विकासाला गती आणता येते. समाजातील वंचित घटकांना ज्ञान, कौशल्य व व्यवसायाची संधी शिक्षणामुळे प्राप्त होते. जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना शिक्षणामुळे अधिक बळकटी प्राप्त होते.

भारतीय घटनेच्या 46 व्या कलमांमध्ये “राज्य जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हीत संवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून रक्षण करील” असे नमूद केले आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** 1986 **मध्ये असे नमूद केले आहे की "देशाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची असून शिक्षण ही वर्तमानातील व भविष्यकाळातील महत्वाची गुंतवणूक आहे". आतापर्यंत जे शैक्षणिक सुविधांपासून वंचित आहेत त्यांच्या विशेष गरजांवर भर देऊन त्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देऊन विषमता दूर करण्यावर भर दिलेला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक, शारीरिक अपंगयांना शिक्षणाच्या संधी खात्रीशीर पुरविण्याची गरज व्यक्त केली आहे.**

**भारत देशात एकूण लोकसंख्येच्या** 8.20 % **समाज आदिवासी आहे. हा समाज वर्षानुवर्ष विविध सुविधांपासून वंचित आहे. त्यांचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे.**

**संशोधनाची गरज**

**आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, व खाजगी अनुदानित शाळांमार्फत दिले जाते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व व शैक्षणिक विकासात आवडीचे क्षेत्र (शैक्षणिक /व्यवसायिक) यांना महत्त्वाचे स्थान आहे असे आढळून आले आहे. आवडीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती अधिक नेटाने प्रयत्न करतात व यशस्वी होतात असे शिक्षण तज्ञ वा. ना. दांडेकर यांनी सांगितले आहे. म्हणून संशोधकाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या क्षेत्राची अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.**

**प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व**

**या संशोधनाचा फायदा मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना पुढीलप्रमाणे होईल.**

1)**आदिवासी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या क्षेत्राची (शैक्षणिक /व्यवसायिक) माहिती मिळवण्यासाठी.**

2) **विविध शालेय उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी.**

**संशोधन समस्या विधान**

**"पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागात असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या क्षेत्रांचा अभ्यास करणे".**

**संशोधन समस्येतील संज्ञाच्या संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या**

**1) पुणे जिल्हयातील आदिवासी विभाग:**

**संकल्पनात्मक व्याख्या: महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी उपयोजनेत पुणे जिल्हयातील नमूद केलेला आदिवासी विभाग** (**आदिवासी उपयोजना** 2001).

**कार्यात्मक व्याख्या: आंबेगाव, जुन्नर, राजगुरुनगर व मावळ तालुक्यातील आदिवासी भाग**

**2) आदिवासी विद्यार्थी:**

**संकल्पनात्मक व्याख्या: आदिवासी विभागातील महाराष्ट्र शासनाने अधीमान्य केलेल्या अनुसूचित जमातीतील शाळेत शिकणारा विद्यार्थी** (**देव गावकर एस जी**)

**कार्यात्मक व्याख्या: जुन्नर**, **आंबेगाव**, **राजगुरुनगर व मावळ तालुक्यातील माध्यमिक शाळेत शिकणारा अनुसूचित जमातीतील विद्यार्थी**.

**3) आवडीचे क्षेत्र:**

**संकल्पनात्मक व्याख्या: विशिष्ट क्षेत्रातील क्रिया किंवा कृतीही इतर क्षेत्रातील क्रिया किंवा कृतीपेक्षा अधिक पसंत असणे आणि नंतर समरसता पूर्वक क्रिया करणे म्हणजे आवडीचे क्षेत्र**.
(**कुलकर्णी के वी**)

**कार्यात्मक व्याख्या: महाराष्ट्र राज्य व्यवसाय मार्गदर्शन व सल्ला केंद्राने विकसित व प्रमाणित केलेल्या आवड शोधन चाचणीद्वारे विद्यार्थ्यांचे वैद्यकीय**, **यांत्रिक**, **वाणिज्य**, **कला** (**साहित्य**), **ललित कला याक्षेत्रातील आवडीसाठी मिळालेले प्राप्तांक**.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे: पुणे जिल्हयातील आदिवासी विभागात शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आवडीच्याक्षेत्रांचा अभ्यास करणे**.

**संशोधन प्रश्न: पुणे जिल्हयातील आदिवासी विभागात असलेल्या विद्यार्थ्यांच्या आवडीच्या क्षेत्रांमध्ये** (**वैद्यकीय**, **यांत्रिक**, **वाणिज्य**, **कला** (**साहित्य**), **ललितकला**) **कोणकोणती भिन्नता आहे**?

**संशोधनाची व्याप्ती: प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे पुणे जिल्हयातील आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांशी निगडीत आहेत**.

**संशोधनाच्या मर्यादा : संशोधनाचे सदर संशोधनाचे निष्कर्ष पुढील गोष्टींवर अवलंबून असणार आहेत**

1)**विद्यार्थ्यांनी चाचणीतील प्रश्नांना दिलेले विविध प्रतिसाद**.

2)**आवड शोधिका चाचणीत अभ्यासलेले विविध घटक**.

**संशोधनाच्या परीमर्यादा: प्रस्तुत संशोधनासाठी**

1) **पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील जुन्नर आंबेगाव राजगुरुनगर व मावळ या चार तालुक्यातील माध्यमिक आश्रमशाळेतील इयत्ता नववी व दहावीतील विद्यार्थ्यांचा समावेश केला आहे**.

2) **महाराष्ट्र राज्य व्यवसाय मार्गदर्शन व सल्ला केंद्राने विकसित व प्रमाणित केलेल्या आवड शोधन चाचणीद्वारे विद्यार्थ्यांचे वैद्यकीय**, **यांत्रिक**, **वाणिज्य**, **कला** (**साहित्य**) **व ललित कला याक्षेत्राचा समावेश केला आहे**.

**पूर्व संशोधनाचा आढावा: विठ्ठल चौथाले**(2008)'**गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा अभ्यास आदिवासी विद्यार्थी: विश्लेषण**, **निष्कर्ष**''**शिक्षण आणि समाज**' **वर्ष** 32,**अंक**1. **ऑक्टोबर डिसेंबर** 2008, **इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन**, **पुणे**.38.

**प्रमुख निष्कर्ष: कलात्मक व्यवसायात विद्यार्थ्यांची व्यवसायिक रुची सर्वात जास्त तर वैयक्तिक व्यवसायात सर्वात कमी आढळून आली**.

**संशोधनाची संशोधनाची कार्यपद्धती:**

**संशोधन पद्धती**: **वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी केला आहे**.

**जनसंख्या निश्चिती: जुन्नर**, **आंबेगाव**, **राजगुरुनगर व मावळ तालुक्यातील आदिवासी विभागातील माध्यमिक आश्रम शाळेतील माध्यमिक स्तरातील इयत्ता नववी व दहावीतील विद्यार्थी**.

**नमुना निवड:** **प्रस्तुत संशोधनात पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील प्रत्येक तालुक्यातील एका आश्रमशाळेची निवड करण्याकरता संभाव्यता नियमावर आधारित नमुना निवड पद्धतीचा स्वीकार केला आहे. यापद्धतीतील सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने नमुना निवड करताना लॉटरी पद्धतीचा उपयोग केला. या आश्रम शाळेतील माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांची निवड असंभाव्यतेवर आधारित सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे केली आहे.**

**माहिती संकलनाची साधने: महाराष्ट्र राज्य व्यवसाय मार्गदर्शन व सल्ला केंद्र मुंबई यांनी विकसित केलेली आवड शोधन चाचणी.**

**संख्याशास्त्रीय साधने: शेकडेवारी.**

**निरीक्षण आणि अर्थनिर्वचन:** वद्यार्थ्यांच्या आवडीच्या क्षेत्रानुसार वद्यार्थ्यांची संख्या व शेकडा प्रमाण (%)

| | आश्रम शाळेतील विद्यार्थी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुली | | मुले | | एकूण | |
| | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| वैद्यकीय, | 19 | 15.0 | 19 | 16.7 | 38 | 15.8 |
| अभियांत्रिकी | 1 | 0.8 | 7 | 6.1 | 8 | 3.3 |
| वाणिज्य | 43 | 33.9 | 39 | 34.2 | 82 | 34.0 |
| कला(साहित्य) | 80 | 63.0 | 75 | 65.8 | 155 | 64.3 |
| ललित कला | 56 | 44.1 | 48 | 42.2 | 104 | 43.1 |
| एकूण | 127 | | 114 | | 241 | |

- **काही विद्यार्थ्यांची आवड विविध क्षेत्रात सारखीच आढळ आढळली असल्याने शेकडेवारीची एकूण बेरीज 100 पेक्षा जास्त येते**

**अर्थ निर्वचन: मुलींची आवड :**

**वैद्यकीय क्षेत्र: 127 मुलींपैकी 15 टक्के मुलींची आवड वैद्यकीय क्षेत्राकडे आहे तर 0.8 टक्के मुलींची आवड अभियांत्रिकी क्षेत्राकडे आहे. 33.9 टक्के मुलींची आवड वाणिज्य क्षेत्राकडे आहे. सर्वात जास्त म्हणजे 63 टक्के मुलींची आवडकला (साहित्य) या क्षेत्राकडे आहे व त्यापाठोपाठ म्हणजे 44.1 टक्के मुलींची आवड ललित कलाक्षेत्राकडे आहे.**

**मुलांची आवड: 114 मुलांपैकी 16.7 टक्के मुलांची आवड वैद्यकीय क्षेत्राकडे आहे तर फक्त 6.1 टक्के मुलांची आवड अभियांत्रिकी क्षेत्राकडे आहे. 34.2 टक्के मुलांची आवड वाणिज्य क्षेत्राकडे आहे. एकूण मुलांपैकी सर्वात जास्त मुलांची आवड म्हणजे 65.8 टक्के मुलांची आवड कला (साहित्य) क्षेत्राकडे आहे व त्या पाठोपाठ म्हणजे 42.1 टक्के मुलांची आवड ललित कला क्षेत्राकडे आहे.**

**एकूण (मुले + मुली) : 241 विद्यार्थ्यांपैकी 15.8 टक्के विद्यार्थ्यांची आवड वैद्यकीय क्षेत्राकडे आहे तर फक्त 3.3 टक्के विद्यार्थ्यांची आवड अभियांत्रिकी क्षेत्राकडे आहे. सर्वात जास्त विद्यार्थ्यांची आवड म्हणजे 64.3 टक्के विद्यार्थ्यांची आवड कला (साहित्य) क्षेत्राकडे आहे व त्यापाठोपाठ म्हणजे 43.1 टक्के विद्यार्थ्यांची आवड ललित कला क्षेत्राकडे आहे.**

**निष्कर्ष: आदिवासी माध्यमिक शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांची आवड कला (साहित्य) क्षेत्राकडे सर्वात जास्त आहे व त्यापाठोपाठ ललित कलाक्षेत्राकडे आहे असे आढळते.**

**शिफारसी:**

**1)पालक, शिक्षक व शासकीय क्षेत्रातील अधिकारी यांनी आदिवासी विभागातील आदिवासी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी किंवा व्यवसायासाठी ललित कला किंवा कला (साहित्य) याक्षेत्रातील संधी उपलब्ध करून द्याव्यात.**

**2) पालक शिक्षक व शासकीय क्षेत्रातील अधिकारी यांनी वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रातील आवड निर्माण होण्यासाठी याक्षेत्रातील शैक्षणिक सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे किंवा या क्षेत्रातील पुरेसे शैक्षणिक उपक्रम राबवावेत**

**शैक्षणिक योगदान: प्रस्तुत संशोधन**

**1) आदिवासी विभागातील आश्रम शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अथवा व्यावसायिक आवड कोणत्या आहेत यासंबंधी अधिक माहिती उपलब्ध करून देईल.**

**2) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम तयार करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आवडीविषयी अधिक माहिती उपलब्ध करून देईल.**

**3) आदिवासी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी किंवा पुढील व्यवसायासाठी कोणत्या संधी पुरवाव्यात याविषयी प्रस्तुत संशोधन मार्गदर्शन करेल.**

**संदर्भ:**

*Best, J.W. and Khan,J.V. (2008). Research in Education.(10th Edition). New Delhi: Prentice Hall.*
*Deogaonkar, S. G. (1992).Tribal Development Plans. Implementation and Evaluation. New Delhi. Concept Publication Company.*

***कुलकर्णी के.वि.** (1996)**.शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे. श्री विद्या प्रकाशन.***

***घोरमोडे, के. यु. आणि घोरमोडे, कला.** (2007). **भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, नागपूर: विद्या प्रकाशन.***

***जगताप, ह. ना.**(1995).**शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे: अनमोल प्रकाशन.***

***दांडेकर, वा. ना.** ( 1996). **शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र.** (2009-10) **पुणे: श्री विद्या प्रकाशन.***

***महाराष्ट्र शासन** , **वार्षिक आदिवासी उपयोजना** (2009-10) **पुणे शासकीय फोटो झिंको मुद्रणालय.***